दि. २२/०३/२०२२.    प्रकरण क्रं.  :— <u>३९८/पीडब्ल्यू/२०१८</u>

निशाणी क्रं.  :— २८

साक्षीदार क्रं.  :— ३
माझे नाव  :— पंढरिनाथ नामदेव भोसले.
वय  :— ६० वर्षे.  कामधंदा  :— सेवानिवृत्त पो.ऊ.नि.
सध्या राहणारा  :— पनवेल.

<u>सरतपास स.स.अभियोक्ता श्री गवळी यांच्या मार्फत</u>

सरकारी वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर आढळून आले.  सबब साक्षीदाराची साक्ष त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

गुन्हा नोंद क्रमांक १५६८/२०१८ या गुन्हयाचा तपास दि. २४/०६/२०१८ रोजी माझेकडे देण्यात आला होता.  त्यावेळी मी बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो.  ठाणे अंमलदार ए.एस. आय. जाधव यांनी माझेकडे सदर तपास दिला होता.  सदर घटनेतील फिर्यादी अनुश्री व तिचा पती जयदिप यांनी आरोपीला पोलीस ठाण्यात पकडून आणले होते.

२.  मी तिच्याकडे घटनेबाबत चौकशी केली असता तिने मला सांगितले कि तिला बांद्रा येथे खरेदीसाठी यायचे होते.  तिने तिच्या पतीला फोन केला असता पतीने खार रेल्वे स्टेशनला येण्यास सांगितले होते.  मी पुन्हा सांगतो कि तिच्या पतीने फिर्यादीला सांताक्रुझ रेल्वे स्टेशनला येण्यास सांगितले होते.  ती सांताक्रुझ रेल्वे स्टेशनला उतरली असता तिच्याशी काहीही ओळख नसताना तिच्याकडे मोबाईल नंबरची मागणी केली.  त्यावेळी आरोपीची तिच्याकडे पाहण्याची नजर तो करत असलेले हावभाव फिर्यादीच्या

मनाला लज्जा उत्पन्न करणारे होते. त्यानंतर फिर्यादी त्या इसमाचे पाठीमागे पळत असताना तिची गाडी सुटली व त्या दरम्यान दुसरी गाडी आल्यानंतर फिर्यादी त्या गाडीत चढली. तिच्या पाठीमागे आरोपी देखील त्याच गाडीत चढला.

३. त्यानंतर तिने तिच्या पतीला ती कोणत्या डब्यात बसली आहे याची फोनद्वारे माहिती दिली. तिचे पती देखील खार रेल्वे स्टेशन येथे त्याच डब्यात चढले. तिने घटनेची माहिती पतीला दिली. त्याचप्रमाणे आरोपी देखील त्याच डब्यात असल्याचे तिने पतीला सांगितले. त्यानंतर तिने व तिच्या पतीने आरोपीला पकडून बांद्रा रेल्वे पोलीस ठाण्यात आणले.

४. त्यानंतर ठाणे अंमलदार यांनी फिर्यादीची फिर्याद नोंद करून घेतली. आता मला फिर्याद दाखवली. सदर फिर्याद तिच आहे. त्यानंतर मी फिर्यादीचे पती जयदिप यांचा जवाब घेतला. दोन पंचाना बोलावून (नि. क्र.२५) प्रमाणे आरोपीचा अटक व अंगझडती पंचनामा तयार केला. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी व पंचाची सही आहे. ती मी ओळखतो. त्यानंतर झालेल्या तपासाच्या आधारे मी आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकेल. आज आरोपी न्यायालयात हजर नाही. (आरोपी तर्फे गैरहजरी माफिचा अर्ज (नि. क्र.२६) वर दाखल करण्यात आलेला असून ओळखी बाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही).

सरतपास संपला.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री व्होरा यांच्यामार्फत

५. मी इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा जवाब नोंदवलेला नाही. मी घटनेचे सीसी टिव्ही फुटेज पाहण्यासाठी गेलो होतो परंतू ज्या ठिकाणी घटना घडली होती ते ठिकाण सीसी टिव्ही फुटेजमध्ये कव्हर झालेले नव्हते. माझ्या तपासादरम्यान असे निष्पन्न झाले नव्हते कि फिर्यादीचा पती सांताक्रुझ रेल्वे स्टेशनला आला होता. फिर्यादीने असे सांगितले नव्हते कि तिच्या पतीला फोन केला असता ते एक मिनिटात सांताक्रुझ रेल्वे स्टेशनला आले होते. हे म्हणने खरे नाही की, आरोपी सांताक्रुझ रेल्वे स्टेशनवर गेला नव्हता व त्याने फिर्यादीकडे तिचा फोन नंबर मागितला नव्हता. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादीने आरोपी विरूध्द खोटी केस दाखल केली आहे.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
स्वाक्षरी/—
(जि. चं. ढेंगळे)
महानगर दंडाधिकारी,
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई.

दि. २२/०३/२०२२.
सराद.